कळंबोलीवासियांना सेवा सुविधा पुरविण्यासाठी दक्ष

अरूणशेठ भगत यांची ग्वाही

विविध १७ सोसायट्यात ३३ लाखांच्या विकासकामांची भुमीपुजने संपन्न

पनवेल- आमदार प्रशांत ठाकूर यांनी आमदार झाल्यानंतर पनवेल तालुक्यात विकास कामांचा झंझावात सुरू केला असून त्यामुळे पनवेल तालुक्याचा चेहरा मोहरा बदलला गेला आहे. तालुक्याप्रमाणेच शहरी व सिडको अंतर्गत भागातही सेवा सुविधा पुरविण्यासाठी ते दक्ष राहिले असल्याचे प्रतिपादन पनवेल तालुका काँग्रेस कार्याध्यक्ष अरूणशेठ भगत यांनी केले.

पनवेल तालुका काँग्रेसच्या वतीने कळंबोली येथे से.३ ई.श्री, गणेश अपार्टमेंट ओनर्स असो. के.एल.६इमारत क्र.८ ते १७ यासमोरील पेव्हरब्लॉक बसविणे.५ लाख रूपये,कळंबोली येथील से.१० सुर्योदय को. ऑप.सोसायटी बिल्डींग नं. सी.३ ते सी ७ प्ला:ट नं,२५ समोर पेव्हर ब्लॉक बसविणे ३ लाख रूपये,कळंबोली येथील से.६ अशिष को. ऑप हौसिंग सोसायटी एफ.६७ ई.६८,ई ६९,इ.७०,ई.७१,जी.७२ या सोसायटीत पेव्हर ब्लॉक बसविणे,३ लाख रूपये,कळंबोली से.८ सत्यम कोृॉप. सोसायटी,प्लॉट नं,१७,सोसायटीसमोर पेव्हरब्लॉक बसविणे,३ लाख रूपये,कळंबोली से. १४ येथील साईराज सोसायटी येथे पेव्हरब्लॉक बसविणे २ लाख रूपये, से.५ मधील महावीर प्लाझा येथे पेव्हरब्र्लाक बसविणे,३ लाख रूपये, से.४ ई येथील श्री. मोरेश्वर ओनर्स बिल्डींगनं.२५ ते ३५ समोर पेव्हर ब्लॉक बसविणे, २ लाख रूपये, से.५ ई लोटस अपार्टमेंट येथे पेव्हरब्लॉक बसविणे, ३ लाख रूपये,से.५ई येथील ओंकार ओनर्स के.एल.१ टाईप ग्रुप नं.५ समोर पेव्हरब्लॉक बसविणे,३ लाख रूपये.गणेश ओनर्स के.एल.१ टाईप समोर पेव्हर ब्लॉक बसविणे,३ लाख रूपये.६ ई दत्त ओनर्स के.एल.२ टाईप बिल्डींग नं. १७ते ३२ समोर पेव्हर ब्लॉक बसविणे ३ लाख रूपये. अशा निवासी सोसायट्यांमध्ये ३३ लाख रूपये खर्चाची कामे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या विशेष प्रयत्नातून शासनाच्या विशेष निधीतून मंजूर करण्यात आली. या विविध विकास कामांची भुमिपुजने बुधवार दि.१० रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाली. त्यावेळी ते बोलत होते.कार्यक्रमासाठी काँग्रेस पक्ष प्रवक्ता सिराज सय्यद, बुधाजी ठाकूर, जेष्ठ नेते एम.डी. पाटील, बशीर पटेल, जाकीर खान, सुभाष पाटील, प्रकाश शेलार, सुनिता माळी, मंगला मोरे,उषा नामदेव घरत,विरसिंग, अमर पाटील, तुषार जगदाळे, सुरेंद्र सिंग,जोहेब पटेल, भानुदास झगडे,आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना अरूण शेठ भगत म्हणाले की, गेल्या ५२ वर्षात शेतकरी कामगार पक्षाच्या राजवटीत अकार्यक्षम लोकप्रतिनिधींमुळे सिडको हद्दीतील सोडाच पण तालुक्यातही कुठे विकासकामेच झाली नाही त्यामुळे तालुक्याचा विकास रखडला.या ५२ वर्षाच्या प्रदिर्घ काळानंतर तालुक्यात काँग्रेस आमदार म्हणून आमदार प्रशांत ठाकूर निवडून आले. त्यानंतर आमदार प्रशांत ठाकूर यांनी आमदार निधी, राज्यशासनाचा निधी मुख्यमंत्र्यांचा विशेष निधी, विविध विकास आस्थापना महामंडळाच्या निधीतून कोट्यवधी रूपयांची कामे करून हा बॅकलॉग भरून काढण्याचे काम केले. तालुक्यात असे एकगाव नाही की जिथे आमदार प्रशांत ठाकूर यांनी विकासाचे काम केले नाही. प्रत्येक गावात लोकांच्या हिताची विकासकामे करून विकास साधण्यात आला.सिडको अंतर्गत भागात आमदार प्रशांत ठाकूर यांनी स्थानिक रहिवाशंच्या मागणीनुसार प्रयत्न करून सिडको व राज्य शासनाच्या निधीतून रस्ते, गटारे, पेव्हरब्र्लाक अशी विविध विकासकामे करून रहिवाशांना सेवा सुविधा देण्याचा प्रयत्न केला आहे.आमदार प्राांत ठाकूर यांनी केलेल्या विकासकामांमुळे सिडको अंतर्गत भागात कधी नव्हे तो विकासाची पहाट झाली आहे. त्यामुळे रहिवाशांनी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहुन ताकत उभी करावी. यावेळी काँग्रेस पक्ष प्रवक्ता सिराज सय्यद, बुधाजी ठाकूर आदी नेत्यांनी मार्गदर्शन केले .